# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

।। यः क्रियावान् स पण्डितः ।।

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

विद्यार्थी कल्याण मंडळ

डॉ. संजयकुमार एन. दळवी
एम.एस्सी., पीएच.डी.
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ


**अति तात्काळ**

संदर्भ क्र.: विकमं/२०१४–१५/५७९ दिनांक : ११/११/२०१४.

प्रति,
**मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

विषय :— जनहित याचिका क्र. १०३/२०११ हिंदू जनजागृती समिती विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर राष्ट्रध्वज वापराबाबत...

संदर्भ क्र. :— महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) यांचे अमवि २०१४/३७१६९/ मुंवि/मवि—२/८९६४, दि. २० सप्टेंबर, २००९ चे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाचे राष्ट्रध्वज वापराबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थेत/पदव्युत्तर विभागात संदर्भिय पत्रात खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार राष्ट्रध्वज वापराबाबत आपण आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

१. राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनी प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर करु नये.

२. प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर करु नये यास समाजात, विद्यार्थ्यांत, प्रसिध्दी करणेसाठी आपल्या विभागातील एन.जी.ओ. यांना पत्र दयावे.

३. विद्यार्थ्यांनी प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर करु नये अशी विनामूल्य बातमी वृत्तपत्रात दयावी.

४. स्थानिक केबल ऑपरेटर यांनाही टेलिव्हिजन वरती प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर न करणेबाबतची टिप प्रसिध्द करावी.

तसेच महाविद्यालयांनी/संस्थानी आपल्या महाविद्यालयाच्या/संस्थेच्या संकेतस्थळावर, सूचना फलकांवर व इतर ठिकाणी याबाबत सूचना प्रसिध्द करावी.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ


**विद्यार्थी कल्याण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे – ४११००७.**

☎ ०२०–२५६०११६०, ६५००३७००/०१ फॅक्स : ०२०–२५६०११५४ मो.: ९८५००१४४६६

६१९

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

फोन नं ०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्रमांक-अमवि/२०१४/३७१६९/मुंवि/मवि-२ 8964 दिनांक २०/९/२०१४

**अतितात्काळ/न्यायालयीन प्रकरण/ईमेलव्दारे**

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. सर्व कुलसचिव, अकृषि विदयापीठे.

कुलसचिव यांचे कार्यालय
... फुले पुणे विद्यापीठ पुणे-७.
आवक क्र.-आर/3243
दिनांक- 5/11/2014
जावक दिनांक- 7/11/14
विभाग- PRD/SW

**विषय - जनहित याचिका क्र. १०३/२०११**
**हिंदू जनजागृती समिती विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर**
**राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत.**

**संदर्भ - १.मा.अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी मा. संचालक उच्च शिक्षण यांना लिहीलेले पत्रक्रमांक न्यायाप्र/२२१४/प्र.क्र.३००/आस्था-१, दिनांक १८/९/२०१४**

**२.मा.सहसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी सर्व सहसचिव/उपसचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना लिहीलेले पत्रक्रमांक न्यायाप्र-२२१२/प्र.क्र.७/१४/समन्वय, दिनांक २८/८/२०१४**

**३.मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग यांनी मा प्रधान सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना लिहीलेले पत्रक्रमांक ०३१३/७१४/प्र.क्र.६२/विशा १अ, दिनांक २५/८/२०१४**

उपरोक्त विषयासंबंधीच्या संदर्भिय पत्रक्रमांक १,२,३ व श्री.ए.बी.वग्यानी शासकीय अभियोक्ता, उच्च न्यायालय, अपीलेट साईड, रिट सेल, मुंबई यांनी मुख्य सचिव व इतर, अप्पर व प्रधान सचिव महोदय यांना लिहीलेले दिनांक ८/८/२०१४ चे पत्र, याचिका क्रमांक १०३/११ दिनांक ४/८/२०१४ च्या निर्णयाची झेरॉक्स प्रत एकूण १ ते १० पेजेस आहेत. ती सोबत जोडली आहेत. त्याचे वाचन करावे.

आपल्या विभागातील अकृषिक विदयापीठास व अनुदानित महाविदयालयास व विदयापीठामार्फत सर्व कायम विना अनुदानित महाविदयालयास खालीलप्रमाणे कळवावे. आपले वेबसाईटवर सर्व प्राचार्यांना नोटीस प्रसिध्द करावी.

१. राज्यातील सर्व शाळा व महाविदयालयांमध्ये विदयार्थ्यांनी प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर करु नये.

२. प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर करु नये यास समाजात, विदयार्थ्यांत, प्रसिध्दी करणेसाठी आपल्या विभागातील एन.जी.ओ. यांना पत्र दयावे.

३. विदयार्थ्यांनी प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर करु नये अशी विनामूल्य बातमी वृत्तपत्रात दयावी.

४. स्थानिक केबल ऑपरेटर यांनाही टेलिव्हिजन वरती प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर न करणेबाबतची टिप प्रसिध्द करावी.

विभागीय सहसंचालक यांनी सामाजिक कार्य करणेसाठी आपल्या विभागातील एन.जी.ओ. ची यादी व केबल ऑपरेटरची यादी, नेहमीसाठी, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उपलब्ध करुन घ्यावी. सहसंचालक कार्यालयाची वेबसाईट अद्यावत ठेवावी. वेबसाईटवर नोटीस प्रसिध्द करणे सोयीचे होते. नोटीस/पत्राचे ईमेल सर्व महाविदयालयांना पाठवावेत. प्राचार्य सर्व अशासकीय यांचे ईमेल यादी, मोबाईल क्रमांकही प्राप्त करुन यादी करावी.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास तसेच शासनास सादर करावा.

२९/१०/२०१४

(डॉ. प्र.रा. गायकवाड)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १.

प्रत,

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना शासनपत्रक्रमांक न्यायाप्र/२२१४/प्र.क्र.३००/आस्था-१, दिनांक १८/९/२०१४ च्या संदर्भात माहितीसाठी सविनय सादर.
२. निवडनस्ती, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे १.

07 NOV 2014

ई-मेल/फॅक्सद्वारे

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
20 SEP 2014
आवक क्रमांक- ३७९६९
शाखा- मवि 2

महाराष्ट्र शासन

क्र:न्यायाप्र २२१४/प्र.क्र.३०० /आस्था-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक-१८ सप्टेंबर, २०१४.

प्रति,
संचालक (उच्च शिक्षण) संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
पुणे.

विषय:- जनहित याचिका १०३/२०११
हिंदू जनजागृती समिती विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर
राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत.
संदर्भ:-कक्ष अधिकारी, समन्वय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे पत्र क्र. न्यायाप्र-२२१२/प्र.क्र.७९/१४/समन्वय, दि.२८.८.२०१४

सोबत संदर्भाधीन पत्राची व सहपत्राची प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येत आहे. तरी, सदर प्रकरणी शारिरीक शिक्षण महाविद्यालयांशी संबंधित करण्यात आलेल्या उपाययोजनाचा फलनिष्पती अहवाल एकत्रितरित्या गृह विभागास (विशा-१ अ ) तसेच विभागाच्या समन्वय आणि या कार्यासनास 2 दिवसात सादर करावा.

हे न्यायालयीन प्रकरण असल्याने सर्व प्राथम्याने कार्यवाही करावी.

र.बा.मयेकर
(र.बा.मयेकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या कार्यकक्षेत येणाऱ्या शारिरीक शिक्षण महाविद्यालयांचा अहवाल उलट-टपाली संचालक, उच्च शिक्षण यांचे मार्फत शासनास सादर करावा.

र.बा.मयेकर
(र.बा.मयेकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

न्यायालयीन प्रकरण
तात्काळ

क्रमांक :न्यायाप्र-२२१२/प्र.क्र.७९/१४/समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २८ ऑगस्ट, २०१४.

प्रति,

सर्व सह सचिव /उप सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय :- जनहित याचिका क्र.१०३/२०११
हिंदू जनजागृती समिती विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर
राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत.

संदर्भ :- या कार्यासनाचे समक्रमांकित पत्र दि.२३ मे, २०१४.

उपरोक्त विषयावरील गृह विभागाच्या पत्र क्र.संकीर्ण ०३१३/७१४/प्र.क्र.६२/विशा १ दि.२५ ऑगस्ट, २०१४ ची प्रत सहपत्रांसह सोबत जोडली आहे.

२. जनहित याचिका क्र.१०३/२०११ च्या संदर्भात मा.उच्च न्यायालयात दि.०४/०८/२०१४ रोजी झालेल्या सुनावणीत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या खालील आदेशानुसार शासनाने केलेल्या सर्व उपाययोजनांबाबतची माहिती अतिरिक्त प्रतिज्ञापत्राद्वारे मा.उच्च न्यायालयास सादर करण्याचे आदेश देण्यात आले असल्याचे वरील पत्रान्वये कळविण्यात आले आहे. :-

१) राज्यातील सर्व शाळां व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर करु नये, यासाठी सूचना जारी करण्याबाबत विचार करावा.

२) शालेय शिक्षण विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग या विभागांनी अशा प्रकारचे निदेश राज्यातील विविध शैक्षणिक संस्थांना द्यावेत.

३. तरी मा.न्यायालयाच्या वरील आदेशानुसार उचित कार्यवाही करुन, आपल्या उप विभागाशी संबंधित करण्यात आलेल्या उपाययोजनांचा फलनिष्पती अहवाल एकत्रितरित्या गृह विभागास तसेच समन्वय कार्यासनास चार दिवसांच्या आत पाठविण्यात यावा.

४. प्रसगत: असे कळविण्यात येते की, या कार्यासनाच्या संदर्भाधिन पत्रानुषंगाने का.. कार्यासनांकडून ( तांशि-१/संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई /विशि-३/मशि-३/तांशि-७ ) प्राप्त झालेली माहिती गृह विभागास शासन पत्र दि.१७ जून, २०१४ अन्वये पाठविण्यात आली आहे. तरी सदर प्रकरणी आपल्या उप विभागाशी संबंधित करण्यात आलेल्या उपाययोजनांचा फलनिष्पती अहवाल ( सद्यस्थिती ) एकत्रितरित्या गृह विभागास तसेच समन्वय कार्यासनास सादर करण्याबाबत प्राथम्याने कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

(शैला तारगे पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

C:\Users\reena.nakhawa\Desktop\Reena Nakwa__Backup\C Drive Data\DESK OFFICER\Court Cases.docx

# महाराष्ट्र शासन

(3)

अति-तात्काळ / न्यायालयीन कामकाज प्राथम्य
दूरध्वनी व फॅक्स क्र. २२१८८१२९/२२१८८११५
ई मेल - home_special1a@maharashtra.gov.in

क्र. ०३१३/७१४/प्र.क्र. ६२/विशा १ अ
गृह विभाग, ७ वा मजला,
जागतिक व्यापार केंद्र-१, कफ परेड,
मुंबई-५.
दिनांक :- २५ ऑगस्ट, २०१४.

प्रति,

प्रधान सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषय - जनहित याचिका क्र. १०३/२०११
हिंदू जनजागृती समिती वि. महाराष्ट्र शासन व इतर
राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत

संदर्भ - विभागाचे पत्र क्र. रिट याचिका ०११२ / २८७ / प्र.क्र. ७८ / विशा १अ, दि. २६.३.२०१३

श्री. अभिनंदन वाग्यानी, शासकीय अभियोक्ता यांचे दि. ८.८.२०१४ चे पत्र व त्यासोबतच्या मा. उच्च न्यायालयाच्यादि. ४.८.२०१४ च्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

२. जनहित याचिका क्र. १०३/२०११ च्या संदर्भात मा. उच्च न्यायालयात दि. ४.८.२०१४ रोजी सुनावणी झाली. सदर सुनावणीमध्ये मा. न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

अ) राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजांचा वापर करू नये यासाठी सूचना जारी करण्याबाबत विचार करावा.

ब) शालेय शिक्षण विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग या विभागांनी अशा प्रकारचे निदेश राज्यातील विविध शैक्षणिक संस्थांना द्यावेत.

३. मा. न्यायालयाने सदर याचिकेसंदर्भात दिलेल्या आदेशाबरहुकूम शासनाने केलेल्या स… उपाययोजनांबाबतची माहिती अतिरिक्त प्रतिज्ञापत्रामार्फत मा. न्यायालयास सादर करण्याचे आदेश दिले आहेत. सदर प्रतिज्ञापत्र दि. २९.८.२०१४ पूर्वी सादर करावयाचे आहे.

४. सबब, उपरोक्त न्यायालयाच्या आदेशांनुसार तात्काळ उचित कार्यवाही करावी व करण्यात आलेल्या उपाययोजनांचा फलनिष्पत्ती अहवाल आपणांस हे पत्र मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत या विभागास पाठवावा अशी विनंती आहे. सदर न्यायालयीन प्रकरणावर विहित कालमर्यादेत कार्यवाही करणे अत्यावश्यक असल्याने कृपया सदर प्रकरणी प्राथम्याने कार्यवाही करावी.

(अमिताभ राजन)
अपर मुख्य सचिव, गृह विभाग.

सहपत्र - वरीलप्रमाणे.

DS/Court

8383

COURT MATTER
PHONE:22677694
Email.- gpbombay2007@rediffmail.com
Fax : 22673093

No.GP/WP/ABV/ 8383 /2014
Office of the :
Government Pleader,
High Court, A.S., Writ Cell
Mumbai-400 032.

Date : 8th August, 2014.

To,

1) The Chief Secretary,
Government of Maharashtra
Mantralaya, Mumbai-32.
2) The Additional Chief Secretary to Government
Home Department,
Mantralaya, Mumbai-32.
3) The Principal Secretary to Government,
Urban Development Department
Mantralaya, Mumbai-32.
4) The Principal Secretary to Government,
Rural Development Department
Mantralaya, Mumbai-32.
5) The Principal Secretary to Government
School Education and Sports Department
Mantralaya, Mumbai-32.

ACS/Home
PS/UD-2
PS/H&T
PS/RDD
Secy/SE/Edu.

Spl-1(A)
13/8/14

Sub : High Court, A.S.,
Public Interest Litigation No. 103 of 2011
Hindu Janjagruti Samiti
Vs...
State of Maharashtra and Ors.

Ref : This office letter No.GP/WP/ABV/ dt. 3.5.21014.

Sirs,

The above PIL pertains to seek directions against the State of Maharashtra to restrain the public at large to use, sale, purchase of plastic and papers made National Flag and further impose strict ban on its distribution and sale. Further relief is sought to strictly implement Government Resolution dated 22nd August, 2007, with regard to not to use the plastic ano papers made National flags. Further, reliefs are sought to seek preventive measures that the plastic made National Flags are not used on National days such as 26th January and 15th August and or any other events.

The above PIL came up for hearing before Their Lordships Hon'ble Mr. Justice A. S. Oka and Mr. Justice A. S. Chandurkar on 4th August, 2014. After hearing the Advocate for the Petitioner and Shri A. B. Vagyani, Government Pleader for the Respondent State, the Hon;ble Court was pleased to issue Rule, returnable on 29th September, 2014. The Hon'ble Court has directed the State Government to file an additional affidavit setting out the further steps taken by the State Government in the subject matter, as stated in para no. 7 to 10 of the Order dated 4.8.2014 passed by the High Court.

(9)

Copy of detailed order dt. 4.8.2014 is enclosed herewith for your perusal and necessary compliance.

You are, therefore, requested to depute a senior responsible officer with instructions in compliance with the Order dated 4.8.2014, so as to file additional affidavit in the above matter well in advance, before the next date of hearing i.e. 29th September, 2014.

Kindly treat this as most urgent and important.

Yours faithfully,

( A. B. Vagyani )
Government Pleader,
High Court, A.S., Writ Cell, Mumbai-32.

Encl: as above
Copy to :-
No.GP/WP/ABV/

The Under Secretary to Government,
Law and Judiciary Department
Mantralaya, Mumbai-32.

NBK/